# टाटा पॉवरच्या माहसीर संवर्धन मोहिमेत १५०० मत्स्यशिलेदार सहभागी

**मुंबई :** टाटा पॉवर ही देशातील सर्वात मोठी वीज एकात्मिक कंपनी आपल्या स्थापनेपासूनच इको-जिर्णोद्धार आणि इको-विकासासाठी कायम अग्रेसर राहिली आहे. माहसीर नावाने ओळखल्या जाणा्या माशांच्या चिंताजनक प्रजातींच्या संवर्धनासाठी तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम टाटा पॉवरने १९७० मध्येच हाती घेतला होता. त्यावेळी फक्त एकहाती राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नंतर टाटा पॉवरच्या ह्यअक्ट फार माहसीरह्वया उपक्रमामुळे राष्ट्रीय मोहिमेचे स्वरूप प्राप्त झाले. या मोहिमेला गती देताना लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे जवळपास १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि शिक्षक ह्यअक्ट फॉर माहसीरह्वया कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. या १५०० पेक्षा जास्त मत्स्यशिलेदारांनी माहसीर वाचवण्यासाठी पुढाकार घेतला असून राष्ट्रीय स्तरावर जवळपास ४३०० मत्स्यशिलेदार या उपक्रमात सहभागी झाले आहेत.